**सं. फौ. ख. क्र. ९२१/२०२३**
**सरकार विरूध्द स्वप्निल ठाकरे**
**नि.क्र. २७**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ७ चे शपथेवर बयान सुरु</u>**

माझे नांव :- सरला सुरेशराव तायडे,
माझे वय :- ५९ वर्ष,
माझा व्यवसाय :- मजुरी,
राहणार :- नांदगाव खंडेश्वर, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती

**<u>सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता श्रीमती पी. एस. खंडारे यांचे मार्फत सरतपास शपथेवर सुरू</u>**

**१.** मी फिर्यादीला ओळखते. फिर्यादी हा माझ्या बहिणीचा मुलगा आहे. मयत सुरेशराव तायडे हे माझे पती होते. घटना ही दिनांक ०४.०२.२०२३ रोजी मालाणी पेट्रोल पंपासमोर संध्याकाळी ७.०० वाजेदरम्यान घडली होती. त्यावेळेस मी घरी होते. माझ्या घराशेजारील मुलाने मला सांगितले की, 'काकाचा अपघात झालेला आहे, ते दवाखान्यात भरती आहेत'. त्यानंतर मी माझ्या मुलासोबत नांदगाव खंडेश्वर येथील दवाखान्यात गेलो होतो. त्याचदिवशी माझ्या पतीला पंजाबराव हॉस्पिटल, अमरावती येथे पुढील उपचाराकरीता दाखल करण्यात आले होते. दिनांक ०५.०२.२०२३ रोजी डॉक्टरांनी माझ्या पतीला मृत घोषित केले होते. पोलीसांनी माझी विचारपुस करून माझे बयाण नोंदविले होते.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीतर्फे श्री. ए. एस. बावनकुळे वकिल यांच्या मार्फत उलटतपास</u>**

**२.** मी पोलीसांना बयाण देतेवेळी सांगितले होते की 'माझ्या घराशेजारील मुलाने मला अपघात झाल्याबाबत सांगितले होते'. आता मला माझे बयाण दाखविण्यात आले, सदर मजकुर माझ्या बयाणात का नमुद करण्यात आला नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, 'घटनेच्या दिवशी माझे पती पेट्रोल पंपावर काम करत होते. कामावरून ते सायकलने घरी परत येत असतांना त्यांचा आरोपीच्या दुचाकीने अपघात झाल्याचे मला समजले होते, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझे बयाण घेतल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती वयोवृद्ध होते व ते स्वत: सायकलवरून पडल्यामुळे त्यांचा अपघात झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**
**<u>फेर तपास काही नाही.</u>**

दिनांक :— ०७/०८/२०२५

सा.वा.दा.ब.अ.क.केले.

CHHAYA SHAMKUMAR MEHARE
Digitally signed by CHHAYA SHAMKUMAR MEHARE
Date: 2025.08.07 15:52:16 +0530

**(छाया शामकुमार मेहरे)**
न्यायदंडाधिकारी (प्र.श्रे.),
न्यायालय क्र.२, नांदगावं खं.

समक्ष,

CHHAYA SHAMKUMAR MEHARE
Digitally signed by CHHAYA SHAMKUMAR MEHARE
Date: 2025.08.07 15:52:20 +0530

**(छाया शामकुमार मेहरे)**
न्यायदंडाधिकारी (प्र.श्रे.),
न्यायालय क्र.२, नांदगावं खं..